मागासवर्गीयांना शासकीय व निम-शासकीय सेवेत
पदोन्नतीमध्ये आरक्षण.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक : बीसीसी-१०८९/२५५१(अ)/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २३ जानेवारी,१९९१.

पहा : - (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७२-जे, दिनांक २३ मे,१९७४.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७४-डी, दिनांक २८ जानेवारी,१९७५.
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७५/१३७०/१२५४/(अ)/१६, दिनांक ३१ जुलै,१९७६.

**शासन निर्णय** :- शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै,१९७६ अन्वये असे आदेश देण्यात आले आहेत की, ज्या संवर्गात/सेवांत सरळसेवा भरतीचे प्रमाण ६६$^{२}/_{३}$% पेक्षा अधिक होत नाही अशा संवर्गात/सेवांत पदोन्नतीच्या कोटयामध्ये मागासवर्गीयांना आरक्षण लागू करण्यात यावे. वर नमूद केलेल्या दिनांक २३ मे, १९७४ च्या शासन निर्णयातील आदेशाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या तीन गटातील मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नतीसाठी ५० बिंदू नामावली प्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

२. मागासवर्गीयांचे सरळसेवेमध्ये प्रतिनिधित्व वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने अलिकडेच असे आदेश दिले आहेत की, ज्या सेवा/संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक होत नसेल अशा सेवा/संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्यात यावे. सदरील आदेशांचा विचार करुन त्या अनुषंगाने शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय/निम शासकीय सेवेतील ज्या सेवा/संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक नाही अशा सेवा/संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी वर नमूद केलेल्या तीन गटांसाठी ५०% बिंदू नामावली नुसार आरक्षण विहित करण्यात यावे.

३. उपरोक्त आदेश हे सध्या चालू असलेल्या सरळसेवा भरतीमधील (शासन निर्णय, दिनांक १२ जुलै,१९८९) तसेच पदोन्नतीमधील (शासन निर्णय, दिनांक ३० सप्टेंबर,१९८९) अनुशेष भरुन काढण्याच्या विशेष भरती मोहिमे संदर्भात लागू असणार नाहीत. म्हणजेच, ज्या

संदर्भात अनुशेषाची मोजणी होऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे/येत आहे, त्या अनुशेष भरतीसाठी हे आदेश लागू असणार नाहीत.

४. वरील आदेश शासकीय/निमशासकीय सेवा तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, इत्यादीमधील आस्थापनेमधील पदांना लागू रहातील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निमशासकीय संस्था/कार्यालयातील पदांबाबत विहित नियम/अधिनियमाखाली सूचना निर्गमित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र.द.माळवे,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व सचिव,
* संचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, नवी दिल्ली,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सेवायोजन संचालक, मुंबई,
इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालयाचे इतर सर्व विभाग.

* पत्राने.

d.1262001